लोकमत पू. पान क्र. 1



मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघासाठी पोलिस बंदोबस्तात छायाचित्रण करून यंत्रे बंदिस्त पेट्यांमध्ये आणण्यात आली. (छाया : धीरज परब)

# मीरा-भाईंदरसाठी ६०३ ईव्हीएम संच दाखल

## मतदारसंघामध्ये ४८९ मतदान केंद्रे

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघासाठी ईव्हीएम यंत्रणा भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक भागातील प्रमोद महाजन सभागृहातील स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आली आहे.

मीरा-भाईंदर मतदारसंघात ४८९ मतदान केंद्रे आहेत. एरव्ही रॉयल कॉलेज येथे स्ट्राँग रूम व मतमोजणी केंद्र असायचे, पण यंदा स्ट्राँग रूमसह मतमोजणी केंद्राचे नियोजन भाईंदर पूर्वेच्या प्रमोद महाजन पालिका सभागृहात केले गेले आहे. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे यांच्या निर्देशानुसार नवी मुंबईच्या तुर्भे येथील सेंट्रल वेअरहाऊस कॉर्पोरेशनमधून ६०३ बॅलेट युनिट व ६०३ कंट्रोल युनिट व बॅटरी अशी ईव्हीएम यंत्रे शनिवारी स्ट्राँग रूममध्ये आणण्यात आली.

### पोलिस बंदोबस्त

मोठ्या पोलिस बंदोबस्तात आणि छायाचित्रणात यंत्र बंदिस्त पेट्यांमध्ये आणली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नीलेश गौंड, कल्पिता पिंपळे, राजकुमार घरत, निवडणूक नायब अधिकारी प्रदीप मुकणे, स्ट्राँग रूमचे नोडल अधिकारी व पथक, आदींसह शहरातील राजकीय पक्ष, अपक्ष यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सीसीटीव्ही, कॅमेरे व पोलिस, आदींचा बंदोबस्त व जागता पहारा येथे ठेवल्याचे सांगण्यात आले. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिनगारे व ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मतदारसंघास भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला.

# वसईसह नालासोपाऱ्यात आज ठाकूरांचे शक्तिप्रदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी रंगात आली असून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. सोमवारी वसई व नालासोपारामध्ये पिवळे वादळ धडकणार असून मोठ्या शक्तीप्रदर्शनात वसईमधून हितेंद्र ठाकूर आणि नालासोपारामधून क्षितिज ठाकूर हे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

### रॅली काढणार

यावेळी माजी महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, प्रभाग समिती सभापती आणि पंचायत समिती सभापती, माजी नगरसेवक उपस्थित राहणार आहेत. वसईमध्ये उमेदवारी अर्ज भरण्यासाठी स.९ वा. चिमाजी आप्पा मैदानातून रॅली निघणार आहे, तर क्षितिज ठाकूर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी नालासोपारा येथून रॅली निघेल.

# लाखोंची घरफोडी



**नालासोपारा :** विरारच्या कोपरी येथील रुद्राक्ष अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या संगीता विश्वकर्मा (४४) यांच्या घरी शुक्रवारी दुपारी लाखोंची घरफोडी झाली आहे. चोरट्यांनी बंद घराचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश करून बेडरूममध्ये ठेवलेल्या कपाटातून २ लाख ३१ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली आहे. पोलिसांनी शनिवारी घरफोडीचा गुन्हा दाखल केला असून विरार पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# गाडीच्या नावावर फसवणूक

**नालासोपारा :** नायगाव येथील ऑरनेट गॅलेक्सी सोसायटीत राहणारे मुनीम खान (४६) यांची २० ऑक्टोबर २०२१ ते १० ऑक्टोबर २०२३ दरम्यान गाडीच्या नावावर फसवणूक झाली आहे. त्यांच्या ताब्यातील कार ही इस्ताईक खानचा भाऊ मोहम्मद रहीज खान यांना ११ लाख ५० हजार रुपयांना विक्री केली. त्यांचा विश्वास संपादन करून त्यांची गाडी ताब्यात घेतली. तर गाडीसाठी ठरलेल्या एकूण रकमेपैकी २ लाख ४४ हजार रुपये आजपर्यंत त्यांना दिले. उर्वरित ९ लाख ६ हजार रुपये न देता त्यांची फसवणूक केली आहे. नायगाव पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

# नोकरीच्या बहाण्याने गंडा

**नालासोपारा :** शिर्डीनगर येथील ओम साई शांती निवास येथे राहणारे लक्ष्मण यादव (५०) यांच्या मुलीला रेल्वेत नोकरी लावण्याच्या बहाण्याने फेब्रुवारी २०२२ ते नोव्हेंबर २०२३ दरम्यान फसवणूक केली आहे. आरोपी मयूर बलसारा, नीरज कुमार, दीपक आणि त्यांचा एक साथीदार यांनी संगनमत करून लक्ष्मण यांचा विश्वास संपादन करून त्यांच्या मुलीला रेल्वेत नोकरीला लावतो, म्हणून त्यांच्याकडून वेगवेगळ्या खात्यावर ३१ लाख १० हजार रुपये घेऊन फसवणूक केली आहे. आचोळे पोलिसांनी याप्रकरणी शनिवारी गुन्हा

CamScanner
Scanned with OKEN Scanner

## लोकमत पु. पान क्र. १

# सोन्याचे कडे चोरणाऱ्या महिलेला अटक

## बोळींज पोलिसांना यश : मुंबईतून आरोपीला केले जेरबंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विरार येथील एका ज्वेलर्स दुकानातून सोन्याचे कडे चोरणाऱ्या आरोपी महिलेला अटक करण्यात बोळींज पोलिसांना यश आले आहे.




विरारच्या आगाशी रोडवरील प्रकाश ज्वेलर्सच्या दुकानातून १० ऑक्टोबरला संध्याकाळी सोन्याचे कडे चोरीला गेले. घटनेच्या दिवशी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास दुकानात एक बुरखा घातलेली महिला आली होती. तिने लक्ष नसल्याचा फायदा घेत पावणे बावीस ग्रॅम वजनाचे (किंमत १ लाख ७८ हजार रुपये) वाघाची छबी व रेडियम असणारे सोन्याचे कडे चोरून नेले होते. ज्वेलर्स मालक संकेत जैन (वय ३१) यांनी बोळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला होता.

ज्वेलर्स दुकानातील सीसीटीव्हीमध्ये बुरखा घातलेल्या महिलेचे चित्रण झाले होते, पण तिचा चेहरा दिसत नसल्याने आरोपी महिला गेलेल्या मार्गावरील सीसीटीव्ही तपासण्यास बोळींज पोलिसांनी सुरुवात केली. विरार रेल्वे स्थानकावरील सीसीटीव्हीमध्ये तिचा चेहरा दिसला. आरोपी महिलेची मुंबई येथील गुन्हे अभिलेखाची माहिती काढून धारावी येथे राहणाऱ्या ४५ वर्षीय महिला आरोपीला ताब्यात घेऊन गुन्ह्यातील सोन्याचे कडे हस्तगत करत गुन्ह्याचा उलगडा केला आहे.

# घराच्या नावावर महिलेची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वालीव येथील लवदीप अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या रेणू सिंग (३२) यांची १० ऑगस्ट ते ऑक्टोबर महिन्याच्या दरम्यान घराच्या नावावर फसवणूक झाली आहे.

रेणू सिंग यांना घर देण्याचे आमिष दाखवून आरोपी दीपिका खोडतकर व महेस खोडतकर या दोघांनी त्यांच्याकडून १४ लाख ७० हजार रुपये घेऊन त्यांना घर दिले नाही. त्यांनी वारंवार आपले पैसे परत मागितल्यानंतर त्यापैकी ४ लाख ५० हजार रुपये परत दिले. तसेच उर्वरित पैशाचे दिलेले चेक दिले मात्र ते बँकेत वटले नाही. दोघांनी रेणू सिंग यांची घर देण्याच्या नावाखाली १० लाख २० हजार रुपयांची फसवणूक केली आहे. वालीव पोलिसांनी याप्रकरणी दोघांवर शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

## पु. पान क्र. 4

# आचोळ्यातून रिक्षा चोरीला



**नालासोपारा :** वसंतनगरी लिंक रोडवरील रश्मी दिव्या कॉम्प्लेक्स नंबर १ मध्ये राहणारे गुलाबचंद गुप्ता (५४) यांची ४० हजार रुपये किमतीची रिक्षा चोरीला गेली आहे. शुक्रवारी रात्री राहत्या इमारतीच्या बाहेर पार्किंग केलेली रिक्षा चोरी झाली आहे. आचोळे पोलिसांनी याप्रकरणी शनिवारी वाहनचोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# महिलेला मारहाण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरारोडच्या नया नगर, लोधा रोडवरील भागात एका महिलेला दोन पुरूषांनी क्षुल्लक गोष्टीवरून मारून तिचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे.

पूनमसागर इमारतीखाली ४५ वर्षीय महिला हातगाडीवरून भाजी घेत होत्या. बाजूला असलेल्या अब्दुल रजाक राजेसाब जंबवी (५९) हे तिच्याकडे टक लावून बघत होते. त्यावेळी महिलेने त्याला हटकले. त्याचा राग येऊन अब्दुल याने तिला शिवीगाळ केली व गालावर चापट मारली. अब्दुलचा मुलगा अबरार (२३) याने महिलेच्या गालावर व शस्त्रक्रिया झालेल्या भागावर मारून तिचा विनयभंग केला. या प्रकरणी २५ ऑक्टोबर रोजी नया नगर पोलिसांनी अब्दुल व अबरार विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## पु. पान क्र. 2

# बेकायदा शेडचे बांधकाम केल्याने गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** पालिकेची कोणतीही परवानगी न घेता बेकायदा पत्रा शेडचे बांधकाम करणाऱ्यांविरोधात काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशिगाव भागातील मांडवी पाडा, माशाचा पाडा मार्गावर सर्व्हे क्रमांक ७९, हिस्सा क्रमांक १० या जागेत सावजी चव्हाण यांनी मीरा-भाईंदर पालिकेची परवानगी न घेता लोखंडी पत्र्याच्या साहाय्याने शेडचे बेकायदा बांधकाम केल्याचे पालिकापथकास स्थळ पाहणीवेळी आढळले होते.

## प्रभाग अधिकाऱ्यांनी दिली फिर्याद

या प्रकरणी महापालिकेने गुन्हा दाखल केला नव्हता. प्रभाग अधिकारी कांचन गायकवाड यांनी २५ ऑक्टोबर रोजी काशिगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी सावजी चव्हाण विरुद्ध महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे उल्लंघन करून बेकायदा बांधकाम केल्याने एमआरटीपीनुसार गुन्हा दाखल केला आहे. व. पोलिस निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस तपास करत आहेत.

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पू. पान क्र. 4

# पती-पत्नीने केली मंगळसुत्राची चोरी

## १ लाख ६३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**वसई :** धूमस्टाईलने दुचाकीवरून पादचारी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लुटण्याचा प्रताप पती-पत्नीने केल्याचा प्रकार बोळींज पोलिसांनी उघड केला आहे. त्यांच्याकडून १ लाख ६३ हजारांचा मुद्देमालही हस्तगत केला आहे.

दुपारी ३.३० च्या सुमारास विरार पश्चिमेकडील वाय.के. नगर येथून चालत जाणाऱ्या महिलेला पत्ता विचारण्याच्या बहाण्याने लुटण्यात आले होते. राखाडी रंगाच्या स्कुटीवरून आलेल्या पुरुष आणि एका महिलेने महिलेजवळ गाडी थांबवून एक चिठ्ठी दाखवत पत्ता विचारण्याचा बहाणा केला.त्याचवेळी मागे बसलेल्या महिलेने महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावले आणि तिच्या गळ्यालाही दुखापत केली. त्यानंतर ते पसार झाले. त्यामुळे महिलेने बोळींज पोलीस ठाणे गाठले. तिच्या तक्रारीवरून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास सुरु केला. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून चोरट्यांचा पळून जाण्याच्या मार्गापर्यंत ४० ते ५० सीसीटीव्ही कॅमेरे तपासल्यानंतर तांत्रिक माहितीच्या आधारे तपास केल्यावर गुन्हे शाखेला चोरट्यांचा राहत्या ठिकाणाचा पत्ता सापडला. तिथे जाऊन दिनेश हरेश्वर पारदले याच्या मुसक्या आवळल्यावर त्याने ही चोरी पत्नीच्या सहाय्याने केल्याचे कबूल केले.




पती-पत्नीला अटक करुन त्यांच्याकडून ९ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र आणि गुन्ह्यात वापरलेली स्कूटी जप्त करण्यात आली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र तेंडुलकर,पोलीस निरीक्षक प्रकाश सावंत, उपनिरीक्षक किरण वंजारी, विष्णू वाघमोडे, सहाय्यक फौजदार जनार्दन मते, हवालदार किशोर धनु, रोशन पुरकर, प्रफुल सरगर यांनी ही कामगिरी केली.

# सोनसाखळी चोरांना २४ तासांत अटक

## मुद्देमाल पोलिसांनी केला हस्तगत



**वसई :** सोनसाखळी चोरांना २४ तासांत अटक करुन त्यांच्याकडून मुद्देमाल हस्तगत करण्याची कामगिरी विरार गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली आहे.

विरार पूर्वेकडील मनवेल रस्त्यावर पहाटे चालत जाणाऱ्या सुनंद पवार या महिलेला धक्काबुक्की करुन त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र अज्ञातांनी ओढून नेले होते. एका मोटारसायकल आलेल्या २ अनोळखी व्यक्तींनी त्यांना सुरवातीला शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांना धक्काबुक्की करुन खाली पाडले. त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र जबरीने खेचून नेले होते. त्यामुळे भयभित झालेल्या पवार यांनी विरार पोलीस ठाण्यात धाव घेतली.त्यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्हयाचा गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास करताना, घटनास्थळ आणि आसपासच्या परिसरातील ७५ ते ८५ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची पडताळणी करुन चोरट्यांचा मागोवा घेतला. तेव्हा ही चोरी करणारे इसम कातकरी पाडा, चंदनसार रोड, विरार पूर्व या परिसरातील असल्याचे समजले. त्यामुळे गुन्हे प्रकटीकरण पथकाने या परिसरात सापळा रचून अनेक गुन्हे करणारा सराईत तडीपार शंकर हाल्या दिवा आणि त्याचा साथीदार राजेश संतोष वाघ या दोघांना ताब्यात घेतले. कसून चौकशी केल्यावर चोरीसह आचोळे,नालासोपारा आणि माणिकपुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याचे त्यांनी कबूल केले. त्यांच्याकडून १८ तोळे वजनाची ३ मंगळसूत्रे हस्तगत करण्यात आली आहेत.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

म.टा.पु. पान क्र. 1

# मेहतांसह जैन, हुसेन, राणे करणार उमेदवारी अर्ज दाखल

**म. टा. वृत्तसेवा, भाईंदर**


गीता जैन


नरेंद्र मेहता


संदीप राणे


मुझफ्फर हुसेन

मिरा-भाईंदर मतदारसंघातील प्रमुख उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी सोमवारचा मुहूर्त साधणार आहेत. यात माजी आमदार नरेंद्र मेहता, आमदार गीता जैन, महाविकास आघाडीचे मुझफ्फर




हुसेन, मनसेचे संदीप राणे आदींचा समावेश आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत अर्ज दाखल करतेवेळी झालेल्या शक्तीप्रदर्शनामुळे राजकीय वारे बदलले होते. त्यामुळे यंदा सर्वच उमेदवारांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करण्याची तयारी केली असल्याचे समजते.

विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांच्या एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. तिकीट जाहीर होण्यास झालेला विलंब हे त्यामागील एक कारण आहे. येत्या दोन दिवसांत दिवाळीचा सण सुरू होणार आहे. त्यामुळे प्रमुख उमेदवार हे सोमवारी अर्ज दाखल करणार आहेत. तसे त्यांच्याकडून जाहीर करण्यात आले आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी २९ ऑक्टोबर ही शेवटची मुदत असली तरी मागच्या काही दिवसांत मिरा-भाईंदरमध्ये अपक्ष वगळता

भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता आणि आमदार गीता जैन हे भाईंदर पश्चिमेपासून पुढे तहसीलदार कार्यालय अशी रॅली काढत अर्ज दाखल करणार आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार मुझफ्फर हुसेन हे मिरारोडच्या एस के स्टोन मैदानापासून रॅलीकडून अर्ज दाखल करणार आहेत. तर, मनसेचे संदीप राणे अर्ज दाखल करण्यापूर्वी सिल्वर पार्कपासून ते भाईंदर तहसीलदार कार्यालयापर्यंत रॅली काढणार आहेत. आपली रॅली भव्य असावी यासाठी सर्व प्रमुख उमेदवारांकडून विशेष नियोजन करण्यात आल्याचे देखील समजते.

### पोलिसांकडून विशेष नियोजन

मिरा-भाईंदर मध्ये सोमवारी एकाच दिवशी पाच उमेदवार अर्ज दाखल करण्यापूर्वी रॅली काढणार आहेत. यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण हिवू नये, यासाठी मिरा-भाईंदर पोलिसांकडून विशेष नियोजन करण्यात आले आहे. सर्व उमेदवारांना रॅली काढण्यास वेगळे मार्ग ठरवून देण्यात आली आहे. तसेच निवडणूक कार्यालय जवळ दोन उमेदवार आमनेसामने येवू नयेत, म्हणून वेळ ठरवून देण्यात आली. रॅली व निवडणूक कार्यालयाबाहेर आवश्यकतेप्रमाणे बंदोबस्त तैनात असणार आहे.

### मेहता व जैन यांच्याकडून भाजपसह अपक्ष अर्ज

मिरा-भाईंदर मतदारसंघासाठी महायुतीकडून रविवारी दुपारपर्यंत तरी उमेदवार जाहीर करण्यात आला नव्हता. शिवसेनेसह भाजपकडून अनेक जण ही जागा लढवण्यासाठी इच्छुक असल्याने महायुतीत तिढा निर्माण झाला आहे. आमदार जैन, माजी आमदार मेहता की इतर कोणाला तिकीट मिळणार हे अद्याप अस्पष्ट आहे. त्यामुळे मेहता भाजप व अपक्ष असे दोन अर्ज तर जैन भाजप, शिवसेना व अपक्ष असे तीन अर्ज दाखल करणार असल्याचे समजते. ज्याला उमेदवारी जाहीर होईल तो एबी फॉर्म आयोगाकडे नंतर जमा करून अपक्ष अर्ज मागे घेणार असल्याचे कळते.

पुढारी पान क्र. II

# मिरा-भाईंदरचा उमेदवार ठरेना

## आज फैसला, भाजपाचे तिकीट जैन की मेहतांना याची उत्सुकता


**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यामान आमदार गिता जैन यांनी अपक्ष निवडणून आल्यानंतर पहिली अडीच वर्ष शिवसेनेत तर सत्ता बदल झाल्यानंतर भाजपात असा सत्तारुढ पक्षासोबत राहून कार्यकाळ पूर्ण केला. मात्र भाजपाने अत्तापर्यत उमेदवारी जाहीर केली नाही. त्यामुळे मिरा-भाईंदर मध्ये गिता जैन की नरेंद्र मेहता यांना उमेदवारी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.यावर निर्णय सोमवारी होण्याची शक्यता आहे.

मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार काँग्रेसचे मुझफ्फर हुसैन यांच्यासह आ. गिता जैन व माजी आ. नरेंद्र मेहता हे तिन्ही नामवंत राजकीय नेते सोमवारी वसुबारसच्या मुहूर्तावर आपापले उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. भाजपने अद्याप मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघातून अधिकृत उमेदवार जाहीर केला नसतानाही आ. गिता जैन व माजी आ. नरेंद्र मेहता यांनी भाजपसह अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरण्याचा निर्णय घेतला आहे. पक्ष ज्याच्या पदरात उमेदवारी टाकेल त्या विरोधात प्रतिस्पर्धी उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले. यामुळे काँटेकी टक्कर पहायला मिळणार असून कोण बाजी मारणार हे निकालानंतरच स्पष्ट होणार आहे.

■ मिरा भाईंदरमध्ये नरेंद्र मेहता आणि गीता जैन या आजी माजी आमदारांमध्ये महायुतीच्या उमेदवारीवरून जोरदार जुंपली असून, उमेदवारी न मिळाल्यास अपक्ष लढण्याची उभयतांनी तयारी केली आहे. मीरा भाईंदर हा मतदारसंघ कमालीचा चुरशीचा बनला आहे. महायुतीतर्फे आमदार गीता जैन पुन्हा प्रयत्नशील असून माजी आमदार नरेंद्र मेहता पुन्हा सर्व ताकदीनीशी तिकिट मिळविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. अपक्ष आमदार गीता जैन यांनी महायुतीला समर्थन दिल्यामुळे यंदाही आपल्यालाच तिकीट मिळणार असल्याचा त्यांचा दावा आहे.मात्र प्रत्यक्षात राज्यात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांमध्ये यांच्यामध्ये देखील रस्सीखेच सुरु आहे.


गीता जैन


नरेंद्र मेहता

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. ३

# फसवणुकीची रक्कम पोलिसांनी मिळवून दिली परत

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

काशीगाव पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या एका महिलेची वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन ४ लाख ७६ हजाराची फसवणुक करण्यात आली होती. तर शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास एका इसमाची ३ लाख २८ हजार रुपयांची फसवणुक केली होती. काशीगाव पोलीसांनी तपास करून दोघांची फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम तक्रारदार यांना परत मिळवुन दिली आहे. मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशीगाव पोलीस ठाणे परीसरात राहणाऱ्या निलम संकपाळ (३६) यांना वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑन लाईन व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल, मुव्ही रेटींग यांना लाईक अथवा गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवण्याचे आमिष दाखवून फिर्यादी यांची ४ लाख ७६ हजाराची फसवणूक केली होती. या फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच काशीगाव परीसरात राहणारे महेश गोपाळराव गाढवे यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळविण्याचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या माहितीचे अवलोकन केले असता, फिर्यादी यांची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्याअनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठवण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयित खात्यामध्ये रक्कम गोठवण्यात आली. त्यानंतर न्यायालयाकडून फिर्यादी यांची रक्कम परत मिळवण्यासाठी काशिगाव पोलीस ठाणेचे अधिकारी, अंमलदार यांनी पाठपुरावा केल्याने संकपाळ यांची फसवणूक झालेले ४ लाख ७६ हजाराची रक्कम तसेच महेश गाढवे यांचे ३ लाख २८ हजार रुपये अशा प्रकारे दोघांचे ८ लाख ४ हजार रुपये त्यांच्या खात्यावर परत मिळाले आहेत.

पुढारी पान क्र. 1

# गेहलोत ओवळा-माजिवड्यातून भरणार उमेदवारी अर्ज?

## शिवसेनेच्या १४५ मिरा-भाईंदर मतदार संघावरील दाव्याला शह देण्याचा भाजपचा डाव

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

१४५ मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघावर शिवसेनेने दावा केल्याने मिरा-भाईंदरमधील भाजपचे माजी उपमहापौर हसमुख गेहलोत सोमवारी १४६ ओवळा-माजिवडा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरणार असल्याचे भाजपच्या गोटातून सांगण्यात आले. सेनेने मिरा-भाईंदर मतदार संघावर केलेल्या दाव्याला शह देण्यासाठी भाजपने हा डाव खेळल्याचे निदर्शनास येत असून तसे झाल्यास या मतदार संघातील सेनेचे उमेदवार प्रताप सरनाईक यांच्या मतांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

हसमुख गेहलोत हे माजी आ. नरेंद्र मेहता यांचे अत्यंत निकटवर्तीय मानले जातात. मिरा-भाईंदर मतदार संघ भाजपकडे असताना शिवसेनेने जिल्ह्यातील सहा जागांचा फॉर्मुला मांडत भाजप व शिवसेना या दोन्ही पक्षांना सामान जागा वाटपाची मागणी केली आहे. सध्या जिल्ह्यातील सहा जागांपैकी शिवसेनेकडे पाचपाखाडी व ओवळा-माजिवडा मतदार संघ असल्याने यंदा त्यांनी मिरा-भाईंदर मतदार संघावरही दावा केला आहे. यावर अद्याप तोडगा निघाला नसल्याने भाजपने मिरा-भाईंदर मतदार संघ सोडण्यास नकार दिला असून सेनेने हा मतदार संघ आपल्याला मिळावा, असा हट्ट देखील सोडलेला नाही. यामुळे भाजपकडून या मतदार संघातून अद्याप उमेदवार जाहीर केलेला नाही. परिणामी या मतदार संघातील मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

N.B.T. पान क्र. 5

# सड़क पर वाहनों की नहीं होगी मरम्मत, कसा शिकंजा

## कई अवैध गैराज वालों के खिलाफ मामला हुआ दर्ज

■ **निसं, नालासोपारा:** वसई-विरार की सड़कों पर अतिक्रमण की समस्या कम होने का नाम ही नहीं ले रही। कई प्रमुख सड़कों पर अतिक्रमण होने से ट्रैफिक जाम आम नागरिकों के साथ ही वाहनचालकों के लिए नासूर बन चुका है। वसई-विरार मनपा प्रशासन अतिक्रमण रोकने में नाकाम साबित हुआ है। अब इस समस्या से निजात दिलाने के लिए पुलिस प्रशासन को अपने कदम बढ़ाने पड़े हैं।

बता दें कि वसई-विरार में ट्रैफिक जाम की समस्या विकराल हो गई है। गली, मोहल्लों व मुख्य सड़कों पर फेरीवालों ने जहां कब्जा किया हुआ है, तो वहीं अवैध गैराज चलाने वाले भी आधी सड़क पर कब्जा किए बैठे हैं। कई सड़कों पर वाहनों को रिपेयरिंग करते देखा जा सकता है, जिसकी वजह से सड़क पर लंबा ट्रैफिक जाम लग रहा है। यातायात की बढ़ती समस्या को दूर करने के लिए पेल्हार पुलिस स्टेशन के सीनियर पीआई ने पहल की है। सड़कों पर गैराज चलाने वालों के खिलाफ अब शिकंजा कसना शुरू किया है। हाल ही में पुलिस ने कई अवैध गैराज वालों के खिलाफ सार्वजनिक रास्ता रोकने का मामला दर्ज किया है। जानकारी के अनुसार, वसई-विरार की कई सड़कों पर सैकड़ों अवैध गैराज चलाए जा रहे हैं। इन गैराज वालों ने फुटपाथ से लेकर आधी सड़क पर कब्जा जमा लिया है। गैराज वाले बिना रोकटोक के बीच सड़क पर ही वाहनों की रिपेयरिंग करते रहते हैं। वाहनों की मरम्मत के दौरान सड़कों पर ऑयल व अन्य चिपचिपा पदार्थ गिरता है, जिससे सड़कें तो खराब होती ही हैं, रात के समय वहां से गुजरने वाले दुपहिया वाहनों के फिसल कर दुर्घटनाग्रस्त होनी की घटनाएं भी बढ़ गई हैं। मनपा प्रशासन अवैध गैराज वालों पर कोई कार्रवाई नहीं कर रही है, और न ही ट्रैफिक पुलिस की ओर से इनका चालान काटा जाता है।

नालासोपारा स्टेशन से मुंबई-अहमदाबाद हाइवे जाने वाले मुख्य मार्ग पर कम से कम सौ गैराज हैं। इस मार्ग पर सुबह से ही ट्रैफिक जाम लग जाता है। इस समस्या को लेकर पेल्हार पुलिस स्टेशन के सीनियर पीआई जितेंद्र वनकोटी ने ट्रैफिक में बाधा डालने वाले गैराज वालों के खिलाफ कार्रवाई शुरू की है। दो दिन में छह गैराज मालिकों के खिलाफ मामला दर्ज किया गया है।

> **“ कार्रवाई करने का अधिकार मनपा को है, लेकिन अधिकारी कुछ नहीं करते। भीड़भाड़ वाले क्षेत्रों में अवैध गैराज वालों की वजह से यातायात बाधित हो रहा है, अक्सर लोगों में विवाद होता है। इसलिए हमारी ओर से यह कार्रवाई जारी रहेगी।**
>
> *-जितेंद्र वनकोटी, सीनियर पीआई,* पेल्हार पुलिस स्टेशन



## नौकरी दिलाने के नाम पर ठगे 31 लाख रुपये

■ **निसं, नालासोपारा:** शिर्डी नगर में रहनेवाले एक ऑटो चालक की बेटी को रेलवे में नौकरी दिलाने के नाम पर चार लोगों ने 31 लाख रुपये की ठगी की है। आचोले पुलिस स्टेशन में मामला दर्ज किया गया है। शिकायतकर्ता लक्ष्मण श्रीफागू यादव (50) ने पुलिस को बताया कि वर्ष 2022 में वह मयूर बलसारा, दीपक, नीरज कुमार और एक अअज्ञात व्यक्ति के संपर्क में आया था। इन चारों लोगों ने बताया था कि रेलवे के उच्च अधिकारियों के साथ उनकी जान-पहचान है। उनकी बेटी को नौकरी लगा देंगे। उनके झांसे में आकर शिकायतकर्ता यादव ने किश्तों में 31 लाख 10 हजार रुपये जमा कर दिए। रुपये लेने के बाद नवंबर 2023 में बातचीत करना बंद कर दिया। आनाकानी करने लगे। इसके बाद आचोले पुलिस स्टेशन में धोखाधड़ी और ठगी का मामला दर्ज कराया गया। फिलहाल पुलिस मामले की जांच कर रही है।

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

N.B.T. पान क्र. 1

# PM ने दिया डिजिटल अरेस्ट से बचाव का मंत्र

■ विशेष संवाददाता, नई दिल्ली

पीएम नरेंद्र मोदी ने डिजिटल अरेस्ट के बढ़ते मामलों से बचने के लिए लोगों को **'रुको, सोचो और एक्शन लो'** का मंत्र शेयर किया। रेडियो कार्यक्रम 'मन की बात' में पीएम ने जागरुकता फैलाने की भी बात कही। उन्होंने कहा कि कोई भी एजेंसी न तो धमकी देती है, न ही विडियो कॉल पर पूछताछ करती है। न पैसों की मांग करती है। इंटरनेट के तेजी से बढ़ते इस्तेमाल के बीच 'डिजिटल अरेस्ट' धोखाधड़ी का जरिया बनता जा रहा है। इसमें किसी शख्स को फोन या विडियो कॉल से डराया जाता है। फोन कॉल करने वाले पुलिस, CBI, नारकोटिक्स, RBI के फर्जी अधिकारी बनकर कॉल करते हैं। लोगों से कहा जाता है कि सरकारी एजेंसी ने उन्हें अरेस्ट कर लिया है। उन्हें जुर्माना देना होगा। कई लोग ऐसे मामलों में डर जाते हैं और ठगी का शिकार बन जाते हैं। मोदी ने कहा कि ऐसे मामलों में राष्ट्रीय साइबर हेल्पलाइन 1930 पर कॉल करें या cybercrime.gov.in पर रिपोर्ट कराएं।

**फोन या विडियो कॉल कर कहा जाता है कि आपको 'अरेस्ट' कर लिया गया है**




**डिजिटल अरेस्ट जैसी कोई चीज नहीं है। यह सिर्फ धोखाधड़ी है, झूठ और फरेब है।**
**-नरेंद्र मोदी, पीएम**



## एयरक्राफ्ट प्लांट की आज होगी शुरुआत

स्पेन के पीएम पेड्रो सांचेज के साथ पीएम मोदी सोमवार को वडोदरा में C-295 एयरक्राफ्ट की फाइनल असेंबली लाइन प्लांट की शुरुआत करेंगे। इस प्लांट को टाटा अडवांस्ड सिस्टम की ओर से स्पेन के सहयोग से बनाया जा रहा है। स्पेन के पीएम की यात्रा के दौरान पेड्रो और मोदी की द्विपक्षीय वार्ता होगी भी। इसमें कई मुद्दों पर बातचीत की संभावना है। स्पेन के पीएम का यह दौरा 18 साल बाद हो रहा है। 2006 में स्पेन के पीएम जोस लुइस रॉड्रिग्स भारत आए थे।

नवभारत पू. पान क्र. 1

# गीता, मेहता व हुसैन आज भरेंगे नामांकन

■ **मीरा -भाईंदर, (सं).** 145 मीरा -भाईंदर विधानसभा सीट से आज सोमवार को गीता भरत जैन, नरेंद्र मेहता और मुजफ्फर हुसैन अपना नामांकन अर्ज भरेंगे. महाविकास आघाड़ी से कांग्रेस के उम्मीदवार के रूप हुसैन अपना नामांकन अर्ज भरने के लिए मीरारोड पूर्व के एस. के. स्टोन से अपने समर्थकों की रैली के साथ भाईंदर पश्चिम में तहसीलदार कार्यालय पहुंचेंगे. वहीं खबर लिखे जाने तक महायुति से किसी भी उम्मीदवार के नाम की घोषणा नहीं गई थी. गीता भरत जैन और नरेंद्र मेहता दोनों ही महायुति से टिकट पाने के लिए एड़ी चोटी की जोर लगा रहे हैं. महायुति के घटक दल राकांपा के बागी उम्मीदवार अरुण कदम भी आज अपना नामांकन निर्दलीय के रूप में जमा करेंगे. गीता जैन भाईंदर पश्चिम के स्टेशन रोड, शिवसेना गली, 60 फूट रोड, मांडवी तालाब, फाटक रोड, मैक्सस मॉल से होते हुए तहसीलदार कार्यालय तक अपने समर्थकों के साथ नामांकन भरने पहुंचेगी. नरेंद्र मेहता भाईंदर पश्चिम के प्रसिद्ध बावन जिनालय मंदिर से अपने समर्थकों के साथ नामांकन भरने पहुंचेंगे.



CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पान क्र. 2

# पटाखों के ढेर पर मीरा-भायंदर, गली-गली में लगे स्टॉल

भास्कर संवाददाता | भायंदर





पटाखा बिक्री के अपने आदेश की धज्जियां खुद मीरा-भायंदर मनपा उड़ा रही है। मनपा आयुक्त का आदेश सिर्फ खुले मैदान और स्वतंत्र वाणिज्यिक दुकान (आवासीय बस्ती छोड़कर) पटाखा स्टॉल लगाने का है। इसके बावजूद आवासीय क्षेत्र और बिल्डिंग में पटाखे बेचे जा रहे हैं। हैरान करने वाली बात जो सामने आई है, वह यह कि इन पटाखा स्टॉल को मनपा के अग्निशमन विभाग ने बकायदा अनुमति दे दी है।

मनपा के एक अधिकारी ने बताया कि आयुक्त के दोहरे आदेश की वजह से शहर खतरा क्षेत्र बना हुआ है। आयुक्त ने पहले सिर्फ खुले मैदान, गैरआवासीय क्षेत्र में या स्वतंत्र वाणिज्यिक दुकान में पटाखा बिक्री की अनुमति दी थी। बाद में गैरआवासीय क्षेत्र की हर जगह पर स्टॉल की छूट दे दी। उसके आड़ में पटाखा विक्रेता आवासीय क्षेत्र और बिल्डिंग में स्टॉल लगा दिए। आग लगने और उससे होने वाले किसी तरह के जान माल का नुकसान पटाखा विक्रेता ही होने का एक शपथ पत्र लेकर प्रशासन अपनी जिम्मेदारी से हाथ झटक दिया है। उसकी गैरजिम्मेदारी से शहर आज बारूद की ढेर पर है। इसके खिलाफ शिकायतें आईं तो रविवार को अग्निशमन विभाग ने कारवाई के नाम पर खानापूर्ति की। दो-तीन अवैध स्टॉल बंद कराए और आधा दर्जन पर पानी की बौछार की। इस तरह करीब 18 स्टॉल पर कार्रवाई हुई। ये स्टॉल धारक नियम और शर्त की उल्लंघन किए थे।

## पटाखा स्टॉल पर सुरक्षा के इंतजाम नहीं

नियम-शर्तों के अनुसार पटाखा स्टॉल के पास रेती, पानी, सीसीटीवी कैमरा, एक्सटिंगुइशर बाटला आदि रखना अनिवार्य हैं, लेकिन ज्यादातर स्टॉल के पास ये सब अग्निरोधी इंतजाम नहीं है। अगर पटाखे से आग लगी तो बड़ा नुकसान हो सकता है।

# लिफ्ट देकर युवक से लूटपाट चार आरोपी भेजे गए हवालात

भास्कर संवाददाता | विरार




लिफ्ट देकर लूटपाट करनेवाले एक गिरोह के चार आरोपियों को विरार पुलिस ने गिरफ्तार किया है। आरोपी ह्यूमन राइट्स संस्था का स्टीकर लगाकर वारदात को अंजाम देते थे। पुलिस ने आरोपियों के पास से कार सहित लूट का सामान बरामद किया है। आरोपियों की पहचान असरफ रंगरेझा, अलीनजीर खान, रवि कुमार गौतम, आकाश मोदनवाल के रूप में हुई है।

पुलिस मुताबिक, वसई-विरार शहर मनपा में कॉन्ट्रैक्टर के पास काम करनेवाले एक कर्मचारी से 20 अक्टूबर तड़के सुबह करीब साढ़े तीन बजे से लूटपाट की वारदात को अंजाम दिया गया। आरोपियों ने युवक को विरार स्टेशन तक लिफ्ट देने के बहाने घटना को अंजाम दिया। पुलिस ने बताया कि गाड़ी पर ह्यूमन राइट्स संस्था का स्टीकर लगा था। इसलिए आरोपियों को अच्छा समझकर युवक गाड़ी में बैठ गया। गाड़ी कुछ दूर तक चलने के बाद आरोपियों ने चाकू की नोंक पर लूटपाट की वारदात को अंजाम दिया। घटना के बाद पीड़ित ने इसकी शिकायत विरार पुलिस स्टेशन में दर्ज कराई।

**सीसीटीवी फुटेज से मिला गाड़ी नंबर:** पुलिस ने बताया कि शिकायत दर्ज के बाद डिटेक्शन टीम जांच में जुट गई और मुखबिरों को सक्रिय किया। पुलिस ने क्षेत्र में लगाए गए करीब 40 सीसीटीवी फुटेज की जांच की। जांच के दौरान एक कार दिखाई दी। इस कार पर ह्यूमन राइट्स संस्था का स्टीकर लगा था। पुलिस टीम गाड़ी नंबर के आधार पर उसके मालिक तक पहुंच गई।

**बोरीवली में मिला असरफ रंगरेझा:** पुलिस के मुताबिक, गाड़ी मालिक से पूछताछ करने पता चला कि यह गाड़ी घटना वाले दिन बोरीवली में रहनेवाले एक परिचित को दी गई थी। इसके बाद पुलिस टीम बोरीवली निवासी असरफ रंगरेझा के पास पहुंची और पूछताछ के बाद उसे गिरफ्तार कर लिया। इसके बाद आरोपी के निशानदेही पर अन्य आरोपियों को गिरफ्तार किया गया। पुलिस ने बताया कि गिरफ्तार आरोपी शातिर अपराधी है। इसके खिलाफ हत्या, लूटपाट, चोरी जैसे मामले दर्ज हैं।

CamScanner

Scanned with OKEN Scanner

Tims of India -

# Ex-MP duped of ₹52 lakh by man posing as lawyer

**Mumbai:** Bandra-based builder and former Member of Parliament, Dr. Akhtar Hasan Rizvi, filed a formal complaint against Sameer Aziz Boghani, a resident of Mira Road. Boghani impersonated an Advocate and, under the pretext of helping Rizvi in civil and criminal litigations, extorted Rs 52 lakh and cheated him. Rizvi alleged that Boghani, by impersonating a lawyer and presenting himself as a member of the Maharashtra Bar Council, also obtained original legal documents from him. Advocate Rizwan Siddiquee, who represents Rizvi, revealed that, as per the claims, the accused presented a fabricated advocate's ID card to gain his client's trust. TNN


Scanned with OKEN Scanner

FREE PRESS JOURNAL e-Paper

MONDAY, OCTOBER 28, 2024, 11.30 AM

# "Mira Bhayandar: MBVV Cops Scan 85 CCTV Cameras, Nab 2 Chain Snatchers Who Robbed 53-Year-Old Woman Of Her Gold Chain In Virar Within 24 Hours".

The woman who was on a morning walk was not only robbed but also pushed to the ground and assaulted by the duo before decamping with her chain worth more than Rs 80,000 at around 5:30 am on Friday.



**Mira Bhayandar:** Less than 24 hours after two bike-borne men snatched the gold chain of a 53-year old woman in Virar, the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police arrested the duo who turned out to be serial offenders. Notably, the crime detection unit tracked down the culprits after thoroughly scrutinising footage captured by nearly 85 closed-circuit television (CCTV) cameras installed at the crime scene and possible getaway routes.

**About The Incident**

The woman who was on a morning walk was not only robbed but also pushed to the ground and assaulted by the duo before decamping with her chain worth more than Rs 80,000 at around 5:30 am on Friday. After receiving the complaint, a team led by senior police inspector Vijay Pawar scanned the CCTV cameras and apprehended the duo identified as Shankar Halya Diva (37) and Rajesh Santosh Wagh (21) from the Katkari Pada area in Virar (east). Both have confessed to their crime.

----000----

Scanned with OKEN Scann